**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६ अ करिता. )**

क्र.पोमसं/३/११/६/पोनि पदो/मा.दि./१८५/१०
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-०१.
दिनांक :- ११/१०/२०११.

**वाचाः-** १) म.शा.,गृ.वि., यांचे अर्ध शासकीय पत्र क्र.पीएम्एन्-०१०९/
प्र.क्र.५१५ / पोल-५ ब, दिनांक ०६/०७/२००९, व

२) म.शा.,गृ.वि., यांचे पत्र क्र.पीएम्एन्-०१०९/प्र.क्र.५१५/
पोल-५ ब, दिनांक १०/०८/२००९.

**आदेश**

महाराष्ट्र शासनाने संदर्भातील पत्रांन्वये दिलेल्या सूचनावजा आदेश लक्षात घेऊन, आणि या कार्यालयातील आस्थापना मंडळाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन खाली नमूद केलेल्या **"नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक"** यांना **"पोलीस निरीक्षक"** पदावर तात्पुरत्या स्वस्मात पदोन्नती देण्यात येत असून सदर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोरील रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी / घटकात प्रशासकीय सोयीनुसार करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | सहायक पोलीस निरीक्षकाचे नाव | कोठून | कोठे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | मनिष मधुकर कल्याणकर | परभणी | परभणी |
| २. | राजेंद्र विश्राम जुवेकर | ठाणे ग्रामीण | गुअवि |
| ३. | सुरेश शंकर दळवे | जळगांव | नांदेड |
| ४. | सलीम अब्दुल रहीम शेख | अहमदनगर | पोप्रवि, जालना |
| ५. | शेषराव दगडूजी ठोंबरे | जालना | पोप्रवि, जालना |
| ६. | सुभाष गोविंद काळे | नागपूर ग्रामीण | वर्धा |
| ७. | बाळासाहेब शंकर गावडे | बृहन्मुंबई | उस्मानाबाद |
| ८. | विजय गोवर्धन पाटकर | अमरावती ग्रामीण | बुलढाणा |
| ९. | दयानंद सदाशिव गावडे | रायगड | सोलापूर ग्रामीण |
| १०. | श्रीमती उषा परसराम खंदारे | पोप्रवि, नागपूर | पोप्रवि, नागपूर |
| ११. | सुरेश मारुती चौधरी | पुणे शहर | मपोप्रवि, सोलापूर |

**के.सुब्रमन्यम्,**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे शहर
पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद / परभणी / रायगड / अमरावती ग्रामीण / अहमदनगर / जालना / जळगांव / वर्धा / बुलढाणा / सोलापूर ग्रामीण / नागपूर ग्रामीण / नांदेड / ठाणे ग्रामीण.

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई / गुअवि, म.रा., पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, जालना / नागपूर व महिला पोप्रवि, सोलापूर.

२. वर नमूद केलेल्या सहायक पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द निलंबन / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील, तर त्यांना संबंधीत घटक प्रमुखांनी पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणांची

सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सद्वारे तात्काळ पाठवावी व पुढील आदेशांची वाट पहावी, आणि जर त्यांचेविरुद्ध वरीलपैकी कोणतेही प्रकरण प्रलंबित नसेल तर त्याना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व हजर झाल्याचा दिनांक त्याच दिवशी या कार्यालयास कृपया कळवावा.

३. सदर सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

अ) सदर पदोन्नती प्रथम ११ महिने किंवा शासन व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडून निवडसूचीस मान्यता मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता असेल.

ब) सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत स.पो.नि. यांना नियमीत पदोन्नतीचे म्हणजे ज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

**४. उपरोक्त आदेशात नमूद केलेल्या ज्या पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत निर्गमत केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही, अशा पोलीस अधिकाऱ्यांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा पदोन्नतीच्या पदात भोगण्यास ते तयार असल्याची लेखी पूर्वसंमती घेवून व त्यास अधिन राहूनच पदोन्नतीवर सोडण्यात यावे, व तसा स्पष्ट उल्लेख संबंधीत अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसंबंधीच्या कार्यमुक्त आदेशांमध्ये करण्यात यावा. तसे संमतीपत्र या कार्यालयास दोन प्रतीत (लक्षवेध-कक्ष ३ व कक्ष ११) पाठविण्यात यावे, व त्याची प्रत संबंधित अधिकारी ज्या घटकात तात्पुरत्या पदोन्नतीवर बदलून जात आहेत त्या घटकाप्रमुखांस देखील पाठवावी.**

५. पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदातील वेतन वाढीनंतर वेतननिश्चिती करिता द्यावयाच्या विकल्पाबाबत शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपूर-१२९८/प्र.क्र.१३/९८/सेवा-१०, दिनांक १०/१२/१९९८ मधील आदेशांची माहिती पदोन्नत झालेल्या सर्व सहायक पोलीस निरीक्षकांचे कृपया निदर्शनास आणून द्यावी, (एक टप्पा पदोन्ननतीचे ठिकाणी पदोन्नतीवरील नेमणुका असल्यास सदरहू बाब लागू होत नाही.)

६. **शासन पत्र, गृह विभाग, क्र. पीएमएन्-०१०८/प्रक्र ८८३/ पोल ५ ब, दि.२९/७/०८ मध्ये नमूद केल्यानुसार, शासन निर्णय गृ.वि., क्र.पीएमएन्-०२९७/सीआर-४७४/पोल-५ ब, दि.२६/२/०४ अन्वये महाराष्ट्र पोलीस दलातील त्यावेळी राजपत्रीत "ब" असलेल्या पोलीस निरीक्षक पदाचा दर्जा वाढवून ते पद वर्ग "अ" करण्यात आले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३२० नुसार राज्य शासनाच्या सेवेतील सर्व राजपत्रित पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. याबाबत मा.आयोगास पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावास मिळणाऱ्या मंजूरीच्या अधिन राहून सदर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

७. **तसेच शासन पत्र, गृह विभाग, क्र.पीएमएन्-०१०८/प्रक्र १३४/पोल ५ ब, दि.२२/१०/०८ अन्वये पोलीस निरीक्षकांपर्यतच्या राजपत्रित पदावरील पदोन्नत्या नियमित करण्याबाबतच्या आदेशांना शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

**प्रत सादर,**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत :-**

कार्यासन अधिकारी, का.क्र.४, ९, ३६, ४०, व ३ मधील संबंधीत लिपीक.

**Sd/-**

**( डॉ.बी.के.उपाध्याय )**

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)

पोलीस महासंचालक यांचेकरिता.